असा. क्र. १२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साक्य/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी २२, १९९९/माघ २, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.—महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम. | १२५–१२७ |

दिनांक २१ जानेवारी १९९९ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ना. कों. काटे,
सह सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २२ जानेवारी १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ५ डिसेंबर १९९८ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९८ हा प्रख्यापित केला होता :

(समासटीप: १९७१ चा महा. ४७. १९९८ चा महा. अध्या. १७.)

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अधिनियम, १९९८ असे म्हणावे.

(२) तो दिनांक ३० जून १९९८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याचे कलम १ मधील, पोट-कलम (४) मध्ये, "१९९८" या आकड्याऐवजी "१९९९" हे आकडे दाखल करण्यात येतील.

व्यावृत्ती. ३. कोणत्याही व्यक्तीने, दिनांक १ जुलै १९९८ रोजी सुरू होणाऱ्या आणि ४ डिसेंबर १९९८ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती ही, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध ठरली नसती तर, त्याबाबतीत ती व्यक्ती, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९९८ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे, त्या दिनांकापासून दिनांक ३० जून १९९९ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यात आल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झालेला नव्हता असे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे, सुधारण्यात व मुदत वाढवण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

१९९८ चा महा. अध्या. १७. — सन १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ यांचे निरसन व व्यावृत्ती.

५. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९८ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा केलेला कोणताही नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही, नियुक्ती, नियम, काढलेला आदेश किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.